**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक - रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र. २५/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक-४ फेब्रुवारी, २०१२.

# परिपत्रक

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आचारसंहितेबाबत दिनांक- २९/१२/२०११ रोजी एकत्रित आदेश निर्गमित केलेले आहेत. त्यामध्ये राजकीय पक्ष अथवा उमेदवारामार्फत उभारण्यात येणारे बॅनर / होर्डीग कोणत्या आकाराचे असावेत याबाबत कोणतीही तरतूद नाही. तसेच यासंदर्भात आयोगाकडून कोणतेही वेगळे आदेश देण्यात आलेले नाहीत. वस्तुत: निवडणुकीमध्ये लावण्यात येणा-या बॅनर्स, होर्डिंग्ज, इत्यादीवर होणारा खर्च हा संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करावयाचा असतो. उमेदवाराने निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चासाठी आयोगाने मर्यादा निश्चित करून दिलेली आहे. निवडणुकीमध्ये लावण्यात येणारे बॅनर्स, होर्डिंग्जचे आकार हे स्थानिक कायदा/नियमातील तरतुदींच्या अनुषंगाने असणे आवश्यक असते. तसेच त्यासाठी आयोगाने कोणतीही मर्यादा विहित करण्याची आवश्यकता नाही. मात्र आयोगाने आचारसंहितेच्या आदेशामध्ये नेहमी विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांवर दिलेल्या उत्तरांमध्ये (प्रश्न क्रमांक-६९) तात्पुरत्या कार्यालयावर लावण्यात येणारे बॅनर कोणत्या आकाराचे असावेत याचा उल्लेख झालेला आहे. सबब यासंदर्भात स्पष्ट करण्यात येते की निवडणुकीमध्ये बॅनर्स, होर्डिंग्ज लावण्यासाठी परवानगी देताना ती स्थानिक कायदा/नियमातील तरतुदी विचारात घेऊन देण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( डॉ. अ. द. कोल्हे )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत - सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगरपालिका आयुक्त

C:\Documents and Settings\MR. NITIN\Desktop\Cast Validity Letter.doc